

# ‘मेट्रो ३’चा सहावा बोगदा पूर्ण

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ मुंबई मेट्रो-३ मार्गिकेच्या पॅकेज ६मधील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ ते सहार रोड दरम्यानचा ६९२ मीटर लांबीचा बोगदा बुधवारी पूर्ण करण्यात आला. १६० दिवसांत हे काम पूर्ण करण्यात आले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या स्थानकाच्या जवळून जाणाऱ्या तानसा जलवाहिनीला धक्का न लावता हे काम पूर्ण झाले आहे.

१५० निष्णात इंजिनीअर आणि कामगार या बोगद्यासाठी झटत होते. तापी १ या टीबीएम मशिनने १३ सप्टेंबर, २०१८ रोजी छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ ते सहार रोडपर्यंतच्या भुयारीकरणास प्रारंभ केला. ८९ मीटर इतके लांब तापी १ या टेराटेक कंपनीचे टीबीएम मशिन प्रतिदिन ४.३१ मीटर भुयारीकरण पूर्ण करते. भुयारीकरणासोबतच सहार स्थानकाच्या बांधणीचे काम सर्वांत महत्त्वाचे आहे, कारण मुंबईच्या सर्वांत जुन्या आणि तितक्याच महत्त्वाच्या तानसा जलवाहिनीला न हलवता त्याच्या खालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम करण्यात आले आहे.

ब्रेशिया आणि बेसाल्ट यांसारख्या टणक खडकांना भेदत तापी १ने ४९५ आरसीसी सिमेंट रिंगचा वापर करत भुयार तयार केले आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पूर्ण प्रकल्पातील ५२ किमी भुयारीकरणापैकी २० किमीपेक्षा जास्त भुयारीकरण पूर्ण झाले असून, एकूण १७ टीबीएम मशिन दहा लाँचिंग शाफ्टमधून कार्यरत करण्यात आले आहे. यावर प्रतिक्रिया देताना मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या, 'मुंबई मेट्रो-३च्या संपूर्ण प्रकल्पात सहार मेट्रो स्थानकाची बांधणी सर्वांत महत्त्वपूर्ण आणि तितकीच आव्हानात्मक आहे. मुंबईच्या सर्वांत महत्त्वाच्या जलवाहिनीला सुरक्षित ठेवून त्याखालून सहार मेट्रो स्थानकाच्या बांधणीचे काम यशस्वी पार पाडण्यात आमच्या इंजिनीअरना यश प्राप्त झाले आहे.'

## तानसा जलवाहिनीला धक्का न लावता काम फत्ते

- टी-२ ते सहार रोड
- लांबी : ६९२ मीटर
- १६० दिवसांत काम पूर्ण

